महाराष्ट्राच्या ग्रामीण व शहरी भागातील लोकप्रिय दैनिक
दैनिक ठाणे
# जीवनदीप वार्ता
मुंबई • ठाणे • रायगड • पालघर
मुख्य संपादक - रवींद्र घोडविंदे
news.thanejeevandeep@gmail.com
Rs.2/-
मंगळवार ❖ १४ जानेवारी २०२५ ❖ वर्ष ६ ❖ अंक २०० ❖ पाने - ४ RNI NO : MAHMAR/2016/72091 Postal Reg. No. THC/256/2022-2024

# महाराष्ट्रात २१ जिल्ह्यांची नव्याने निर्मिती



## कल्याण जिल्हा निर्मितीची आमदार किसन कथोरेंची मागणी मान्य होणार

दै.ठाणे जीवनदिप वार्ता/मुंबई(प्रतिनिधी)

महाराष्ट्र राज्याच्या प्रशासकीय आणि स्थानिक विकासाचा पाया भक्कम करण्यासाठी २१ नवीन जिल्ह्यांची निर्मिती प्रस्तावित करण्यात आली आहे. येत्या २६ जानेवारी २०२५ रोजी याबाबतची अधिकृत घोषणा होण्याची दाट शक्यता आहे.

राज्यातील सध्या अस्तित्वात असलेल्या ३५ जिल्ह्यांपैकी अनेक जिल्ह्यांचे विभाजन करून हे नवीन जिल्हे तयार करण्यात येणार आहेत. यामुळे प्रशासन अधिक सुलभ होईल तसेच स्थानिक पातळीवर विकासाच्या प्रक्रिया गतिमान होतील, असा सरकारचा विश्वास आहे.

नवीन जिल्ह्यांची प्रस्तावित यादी आणि मूळ जिल्ह्यांचे विभाजन भुसावळ (जळगाव) उदगीर (लातूर) अंबेजोगाई (बीड) मालेगाव (नाशिक) कळवण (नाशिक) किनवट (नांदेड) मीरा-भाईंदर (ठाणे)कल्याण (ठाणे) माणदेश (सांगली/सातारा/सोलापूर) खामगाव (बुलडाणा) बारामती (पुणे) पुसद (यवतमाळ) जव्हार (पालघर) अचलपूर (अमरावती) साकोली (भंडारा) मंडणगड (रत्नागिरी) महाड (रायगड) शिर्डी (अहमदनगर) संगमनेर (अहमदनगर) श्रीरामपूर (अहमदनगर) अहेरी (गडचिरोली) प्रस्तावाचा इतिहास महाराष्ट्राची स्थापना १ मे १९६० रोजी झाली, त्यावेळी फक्त २५ जिल्हे अस्तित्वात होते. कालांतराने जिल्ह्यांची संख्या वाढत गेली. उदाहरणार्थ, २०१४ मध्ये ठाणे जिल्ह्यातून पालघर जिल्ह्याची निर्मिती करण्यात आली होती. २०१८ मध्ये मुख्य सचिवांच्या समितीने २२ नवीन जिल्हे आणि ४९ नवीन तालुके तयार करण्याचा प्रस्ताव मांडला होता. आता त्यातील बहुतेक जिल्ह्यांची घोषणा प्रत्यक्षात येणार असल्याचे दिसते. उदगीर जिल्ह्याचे विशेष स्थान लातूर आणि नांदेड या जिल्ह्यांतील काही भाग एकत्र करून उदगीर हा नवीन जिल्हा तयार केला जात आहे. याबाबतचा निर्णय अंतिम टप्प्यात असून २६ जानेवारी २०२५ पासून उदगीर जिल्हा अस्तित्वात येईल. हा जिल्हा लातूर व नांदेड जिल्ह्यांतील लोकसंख्येच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरेल. नवीन जिल्ह्यांचे फायदे प्रशासन सुलभ होईल प्रत्येक जिल्ह्याचा आकार कमी झाल्याने प्रशासन अधिक चपळ आणि कार्यक्षम होईल. स्थानिक पातळीवर समस्या सोडवण्यास याचा उपयोग होईल. स्थानिक विकासाला गती मिळेल नवीन जिल्ह्यांमुळे गावागावांपर्यंत विकास पोहोचेल. रोजगार निर्मिती, शिक्षण आणि आरोग्य सुविधांमध्ये मोठी सुधारणा होईल. नागरिकांच्या समस्या अधिक जलद सोडवल्या जातील नवीन जिल्ह्यांच्या निर्मितीमुळे प्रत्येक विभागातील नागरी समस्या जलदगतीने सोडवल्या जातील. आव्हाने आणि अडचणी नवीन जिल्ह्यांची निर्मिती ही विकासासाठी महत्त्वाची असली तरी यासाठी प्रचंड आर्थिक गुंतवणूक आणि प्रशासनिक पुनर्रचना करावी लागेल. नवीन जिल्ह्यांचे मुख्यालय, सरकारी कार्यालये, पायाभूत सुविधा उभारण्यासाठी भांडवलाची आवश्यकता असेल. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भूमिका २०१७-१८ मध्ये मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली या प्रस्तावावर विचार झाला होता. त्यांनी राज्याच्या प्रशासकीय गरजांनुसार नवीन जिल्ह्यांची निर्मिती होणे अत्यावश्यक असल्याचे प्रतिपादन केले होते. सध्याच्या सरकारने त्याची अंमलबजावणी सुरू केली आहे.

महाराष्ट्राच्या विकासाची नवी दिशा नवीन जिल्ह्यांची निर्मिती ही महाराष्ट्राच्या प्रशासकीय सुधारणा आणि विकासासाठी एक महत्त्वाचे पाऊल आहे. यामुळे स्थानिक स्वराज्य संस्था अधिक मजबूत होतील, तसेच नागरी सुविधांमध्ये वाढ होईल. येत्या काही वर्षांत या निर्णयामुळे राज्याच्या विकासाला गती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

# सहा विभागाच्या बैठका -शंभर दिवसांचं नियोजन

## मुख्यमंत्री फडणवीस ॲक्शन मोडवर

### योजना, निर्णयांची माहिती लोकांपर्यंत डिजीटल माध्यमाने पोहोचवणार

शासनाच्या विविध योजना, उपक्रम, शासकीय निर्णय इत्यादी माहिती लोकांपर्यंत जलद गतीने आणि प्रभाविरित्या पोहोचविण्यासाठी शासनाचे डिजीटल माध्यम धोरण लवकरच तयार करण्यात येईल. यासाठी यापुढील काळात कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्राचा वापर करण्यात येईल. त्याचबरोबर विविध नवमाध्यमांचा प्रभावी वापर करून शासकीय योजनांची माहिती जनतेपर्यंत पोहोचविण्यात येईल, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज येथे सांगितले.

राज्य शासनाच्या शंभर दिवसा आराखड्यासंदर्भात आज मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचा आढावा घेतला. यावेळी मुख्य सचिव सुजाता सौनिक, 'माहिती व जनसंपर्क'चे प्रधान सचिव तथा महासंचालक ब्रिजेश सिंह आदी उपस्थित होते.

### पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी पर्यटन पोलीस पर्यटन प्रकल्प गतीने पूर्ण करावे

पर्यटकांच्या सुरक्षिततेसाठी राज्यात पर्यटन पोलीस नेमण्यात येणार असून नाशिक येथील राम-काल पथ विकास, आणि सिंधुदुर्ग (मालवण) येथील समुद्रातील पर्यटन हे प्रकल्प वॉररूमशी जोडण्यात येतील, केंद्र व राज्य शासनाकडून राबविण्यात येणारे पर्यटन प्रकल्प गतीने पूर्ण करण्यास प्राधान्य द्यावे. यासह राज्य लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत पर्यटन विभागाच्या १४ सेवा 'आपले सरकार' संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.सह्याद्री अतिथीगृह येथे आगामी शंभर दिवसात पर्यटन विभागाने करावयाच्या कामकाजाचा आढावा मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस यांनी घेतला.यावेळी पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मुख्य सचिव सुजाता सौनिक,पर्यटन विभागाचे प्रधान सचिव अतुल पाटणे, पर्यटन संचालक डॉ बी. एन. पाटील, महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक मनोज सूर्यवंशी यांसह विभागाचे अधिकारी उपस्थित होते.



### शालेय शिक्षणामध्ये महाराष्ट्र आघाडीवर राहील

राज्यातील शालेय शिक्षकांमध्ये प्रचंड गुणवत्ता आहे. त्यांच्या गुणवत्तेला प्रोत्साहन देऊन चांगले परिवर्तन घडू शकते. या बळावर महाराष्ट्र शालेय शिक्षणामध्ये नक्कीच आघाडीवर राहील, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. संविधानाच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त विद्यार्थ्यांना संविधानिक मूल्ये शिकविण्यावर भर द्यावा, असे निर्देशही त्यांनी दिले.

येत्या १०० दिवसात करावयाची कामे आणि उपाययोजना याबाबतच्या आराखड्यावर मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या शालेय शिक्षण विभागाच्या बैठकीत चर्चा करण्यात आली. शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, पणन मंत्री जयकुमार रावल, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, मेघना साकोरे बोर्डीकर, मुख्य सचिव सुजाता सौनिक, शालेय शिक्षण विभागाचे प्रधान सचिव रणजित सिंह देओल, शालेय शिक्षण आयुक्त सचिंद्र प्रताप सिंग यांच्यासह विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव आदी उपस्थित होते. प्रधान सचिव श्री.देओल यांनी सादरीकरणाद्वारे विभागाच्या आराखड्याची माहिती दिली.

### महाज्योती संस्थेमार्फत पाच जिल्ह्यांमध्ये उत्कृष्टता केंद्र सुरू करण्यात येणार

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्थेमार्फत विद्यार्थ्यांसाठी स्पर्धा परीक्षांचे कोचिंग आणि फेलोशीपसारख्या योजना राबविण्यात येतात. महाज्योती संस्थेमार्फत पुणे, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर आणि नाशिक या पाच प्रमुख जिल्ह्यांमध्ये उत्कृष्टता केंद्र स्थापन करण्यात येणार असून या केंद्रामार्फत विद्यार्थ्यांना विविध क्षेत्रांमध्ये प्रशिक्षित करण्याचे उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

सह्याद्री अतिथीगृह येथे इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या पुढील १०० दिवस आराखड्याच्या अनुषंगाने मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी आढावा घेतला.

या बैठकीस इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे दूरदृश्य संवाद प्रणालीद्वारे उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, विभागामार्फत चालविण्यात येणाऱ्या 'विजाभज' प्रवर्गाच्या खासगी अनुदानित निवासी आश्रमशाळामधील विद्यार्थ्यांना तांत्रिकदृष्ट्या अत्याधुनिक गुणवत्तेचे शिक्षण डिजिटल पद्धतीने उपलब्ध करून देण्यासाठी डिजिटल क्लासरूम प्रकल्प राबविण्यात येणार आहे.


# पारेशण वीज कपंनीची कल्याण तालुक्यात दादागिरी

## मनमानी करत शेतीत टॉवरची बांधकामे

दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)

कल्याण तालुक्यातील पिंपळोली, रेवती, म्हस्कल, रुंदे उतणे या गावातून पारेशन वीज वितरण कपंनीची टॉवेर लाईन जात आहे. या टॉवर लाईन चा सर्व्हे केला नाही. शेतकऱ्यांना कोणाऱ्याही प्रकारची माहिती न देताच शेतकऱ्यान्च्या शेतात टॉवर उभे करण्यात आलेले आहेत. हे टॉवर उभारताना मोबदला दिला गेला नाही. शिवाय शेतकऱ्यांची कसानरी जमीन टॉवर मुळे व विदयुत वाहिन्यामुळे, निकामी होतं आहे. यामुळे शेतकरी सांतप्त झाले आहेत. त्यांनी टॉवर ला विरोध केला तर पोलीस बळाचा वापर करत शेतकऱ्यांना घाबरवलं जातं आहे. मळेगाव तें पडघा अशी ही टॉवर लाईन जात असून यामुळे एक हजार हुन अधिक हेक्टर जमीन वापरायोग्य राहणार नाही.

कल्पना नोटीसा. पिंपळोली येथील शेतकऱ्यांना दमदाटी करून टॉवर उभारले गेले आहेत. यामुळे शेतकरी भयभीत झालेला आहे.



**माझ्या शेतात टॉवर चे काम सुरु केले आहे. पारेशन महावीतरण कपंनी मनमानी करत हे काम करत आहे. टिटवाळया पासून माझे गांव जवळ आहे. टॉवर मुळे शेतजमीन निकामी होते.**
**मिलिंद भोईर.**
**शेतकरी म्हस्कल गांव.**

कल्याण तालुक्यातील वसत, आपटी, मांजर्ली, वाहोली, वाहोली पाडा, पिंपळोली, रेवती, म्हस्कल, रुंदे, उतणे, चिंचवळी, खडवली मार्गे पडघा अशी ही टॉवर लाईन जात आहे. या वीज लाईनमुळे शेती असून नसल्यासारखी

**या बाबत पारेशान कंपनीचे समीर कांबळे यांना माहिती घेण्यासाठी वारंवार संपर्क साधला मात्र त्यांनी प्रतिसाद दिला नाही.**
**पारेशन कपंनी मनमानी करत असेल तर शेतकऱ्यांनी टॉवर बांधकामाला विरोध करावा, मी शेतकऱ्यांच्या बाजूने आहे.**
**आमदार किसन कथोरे.**

होणार आहे.त्यामुळे शेतकरी सांतप्त झाला आहे.विशेष म्हणजे टॉवर ची कामे मार्गी लावण्यासाठी काही स्थानिकांना हाताशी धरून शेतकऱ्यामध्ये फूट पाडण्याचे कमा पारेशन कपंनी करत आहे.



### कल्याण तालुक्यातील भात खरेदी केंद्राच्या माध्यमातून शेताकऱ्यांनी लाभ घ्यावा. आ किसन कथोरे

धान्य खरेदी केंद्र हे शेतकऱ्यांच्या सोयीसाठी असते त्यांचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा. व्यापाऱ्यांकडून शेतकऱ्यांची होणारी पिळवणूक थांबणार आहे. चवरे शेतकरी सेवा सोसायटीने शेतकऱ्यांसाठी सुरु केलेला हा उपक्रम कौतुकास्पद आहे. असे प्रतिपादन आमदार किसन कथोरे यांनी भात खरेदीच्या शुभारंभा प्रसंगी बोलताना केले यावेळी जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अरुण पाटील, रवींद्र घोडविंदे, जाणू बुटेरे यांच्या सह गणपत टोके, लक्ष्मण भोईर, चवरे शेतकरी सेवा सोसायटीचे सर्व सदस्य व ग्रामस्थ मोठया संख्येत उपस्थित होते.

जीवनदीप शैक्षणिक संस्था पोई, संचलित
जीवनदीप कॉलेज, गोवेली
मुंबई विद्यापीठाशी कायम संलग्न, नॅक मुल्यांकन (B-Grade) प्राप्त
ADMISSION OPEN 2024-25
११ वी व १२ वी ARTS, COMMERCE, SCIENCE (IT / CS)
UNDER GRADUATE: B.Sc. Data Science, B.Sc. I.T., B.Sc. Chemistry Maths, B.M.S., B.A.F., BAMMC, B.Com., B.A.
POST GRADUATE: M.Sc. IT, M.Sc. Chemistry, M.Com. Advanced Accountancy, M.A. Marathi, M.A. History, M.A. Economics, M.A. Sociology, M.A. Geography, M.A. C&J
Look forward to a BRIGHTER FUTURE
8108559566
9619188558

# ठाण्यातील रा.प.म.च्या आगारांवर अतिक्रमणे

दै.ठाणे जीवनदिप वार्ता/ठाणे(प्रतिनिधी)

ठाण्यासारख्या आदिवासीबहुल जिल्ह्याच्या वाड्यापाड्यात प्रवाशांची वाहतूक करणाऱ्या लाल परीवर आता तिच्याच जागेतून बेदखल होण्याची वेळ आली आहे. ही आगार खासगी कंपन्यांच्या घशात गेली आहेत. ती मुक्त करण्याचे मोठे आव्हान परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्यासमोर आहे. महाराष्ट्रातील महत्त्वाचा जिल्हा म्हणून ठाणे जिल्ह्याकडे पाहिले जाते. जिल्ह्याच्या एका टोकाकडून महत्त्वाच्या कामासाठी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालय गाठायचे असेल, तर येऊन जाऊन २०० हून अधिक किलोमीटरचा प्रवास करावा लागतो. ती जबाबदारी एसटी अर्थात लाल परीने पेलली. परंतु जिल्ह्यातील प्रवाशांच्या वाहतुकीची काळजी घेणाऱ्या एसटीची ठाण्यातील वंदना, ठाणे रेल्वे स्टेशन आणि खोपट आगारांची जागा पार्किंग, मेट्रो, क्लस्टर, सीएनजी पंप, नर्सिंग प्रशिक्षण संस्था, झोपडपट्टी अतिक्रमणांच्या विळख्यात गेली आहे.

**वंदना आगार :** येथून स्वारगेट, सातारा, सांगली, कर्नाटक, सोलापूर आदी भागांतील लांब पल्ल्याच्या गाड्या धावतात. या आगाराला लागूनच १९६५ मध्ये बांधलेली एसटी महामंडळ कार्यालयाची इमारत आहे. शिवाय येथे अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या नऊ इमारती आहेत. या जागेचे क्षेत्रफळ सुमारे १.८६ हेक्टर आहे. या वास्तूंना बांधून ६० वर्षांचा कालावधी उलटला आहे. त्यामुळे येथे नवे कार्यालय, नव्या इमारती उभ्या राहणे आवश्यक आहे. परंतु या जागेवर ठाणेकरांना क्लस्टर योजनेतून घरे बांधून दिली जाणार आहेत. तशा हालचाली सुरू झाल्या आहेत. तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी क्लस्टरसाठी ५० टक्के जागा मागितली असल्याचे एसटीच्या एका अधिकाऱ्याने सांगितले.

**खोपट आगार :** खोपट आगारातून अहिल्या नगर, वडूज, शिर्डी, अक्कलकोट, सातारा आदी लांब पल्ल्याच्या गाड्या जातात. एसटीच्या मालकीची ठाण्यातील ही सर्वात मोठी जागा आहे. सुमारे ५.६ हेक्टरमध्ये ती पसरली आहे. परंतु बांधा, वापरा आणि हस्तांतर करा या गोंडस नावा खाली तिचाही बळी घेतला गेला आहे. एका खासगी कंपनीने एसटीला आगाराचे बांधकाम करून देत मोक्याच्या भागाचा लचका तोडला आहे.. एसटीच्या भूखंडावर कॉर्पोरेट इमारत उभी करून या कंपनीने ती मोठ्या रकमेच्या भाडेतत्त्वावर दिली आहे. एसटी आणि कंपनीत ३० वर्षांचा करार झाला असून, त्यात आणखी ३० वर्षांची वाढ करण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत. पहिला करार २०४० संपुष्टात येणार आहे. वाढीव करार केल्यास तो २०७० मध्ये संपू शकतो. महामंडळाच्या बसला कोंडीचा सामना करावा लागतो. तसेच ठाणे महापालिकेनेही एफएसआयच्या नावाने एसटीच्या भूखंडावर नर्सिंग प्रशिक्षण देणारी इमारत उभी केली आहे. लाल परीचा हा आगार येथून हटण्याच्या हालचाली सुरू झाल्याचे समजते. तर आगाराला लागून असलेली कार्यशाळे लगतची २० फुटांची जागा रहिवासी रस्त्याच्या नावे आधीच ठाणे महापालिकेने गिळंकृत केली आहे. यामुळे कार्यशाळेत येण्या-जाण्यासाठी एसटी बसचालकांना तारेवरची कसरत करावी लागते. शिवाय कार्यशाळेच्या जागेत झोपडीधारकांनी कब्जा केला आहे.

**ठाणे रेल्वे स्टेशन एसटी आगार :** हे आगार सुमारे ४००० चौरस मीटर वर्गात पसरले असून येथून भिवंडी, कल्याण, बोरिवली, भाईंदर, नालासोपारा, वाडा, जव्हार, पालघर आदी भागांतील प्रवाशांची वाहतूक होते. ठाण्यातील एसटीची ही जागा ठाणे रेल्वे स्टेशनला लागून आहे. या ठिकाणी ठाणे महापालिकेला भूमिगत पार्किंग झोन उभा करायचा आहे. त्यासाठी पालिकेने एसटीसोबत पत्रव्यवहार केला आहे. दरम्यान, याच जागेसाठी आता मेट्रोदेखील सरसावली आहे. आगाराच्या खालच्या जागेत मेट्रोला भूमिगत स्टेशन आणि तीन हात नाक्यापर्यंत भूमिगत मार्ग तयार करायचा आहे. त्यासाठी त्यांचीही एसटी आणि पालिकेसोबत प्राथमिक बोलणी सुरू असल्याचे समजते. मेट्रो आणि ठाणे महापालिकेच्या प्राथमिक वादात एसटी महामंडळ आणि प्रवाशांची मात्र गोची झाली आहे.

हे आगार प्रवासी आणि येथील अधिकारी, कर्मचाऱ्यांच्या जीविताला धोका पोहोचवणारे असूनही पालिका आणि मेट्रोच्या वादात तेथे बांधकाम करणे शक्य होताना दिसत नाही. ठेकेदारी वाहनांचा ताबा वंदना, खोपट आणि ठाणे स्टेशन आगारांचा ई-शिवाई, शिवनेरी, ई-बस अशा ठेकेदारी वाहनांनी ताबा घेतला आहे. त्यामुळे महामंडळाच्या लाल परीला तिच्याच आगारात जागा आणि प्रवासी मिळणे कठीण झाले आहे.

## वाचक मनोगत

# पुस्तकांचं कपाट घरात हवच

पुस्तक व इतर ग्रंथ वाचन विशेषता मुलांमध्ये कमी होत असल्याचे दिसून येत आहे. वाचक आणि वाचन संस्कृती वाढावी यासाठी शासन, सामाजिक संस्था आपल्या परीने शिबिरे वगैरे विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून प्रयत्न करीत असतात. वाचन हे महत्वपूर्ण असून वाचनाने चिंतनाबरोबर बौद्धिक क्षमता वाढीस चालना मिळते आणि म्हणूनच, खरंतर मुलांमध्ये बालवयातच पुस्तकांबद्दल प्रेम, वाचन आवड निर्माण होणे, त्याची महती, महत्व समजणे गरजेचे आहे यासाठी प्रत्येक कुटुंबप्रमुखांनी निदान परवडतील अशी ग्रंथसंपदा, वर्तमानपत्रे, मुलांची साहित्य संपदा जाणीवपूर्वक सातत्याने घरी आणावयास हवी, संग्रहित करावयास हवीत जेणेकरून पुस्तकांविषयी उत्कंठा मुलांमध्ये बाल वयातच निर्माण होऊन त्यांना कळत नकळत वाचनाची गोडी आणि सवय निर्माण होईल आणि ती आयुष्यभर राहील यासाठी घराघरातून वाचन साहित्य असणे गरजेचे आहे. एक कपाट तरी पुस्तकांनी भरलेलं हवं. केवळ एक-दोन दिवसाचे शिबिरे वगैरे कार्यक्रम घेऊन वाचन संस्कृतीचे उद्दिष्ट साध्य होईलच असे नाही.

**- विश्वनाथ पंडित,ठाणे**

## गीतासार



गाण्डीवं स्रंसते
हस्तात्त्वक्चैव परिदह्यते ।
न च शक्नोम्यवस्थातुं
भ्रमवतीव च मे मनः ।
१-३० ।

**अर्थ**

हातातून गांडीव धनुष्य गळून पडत आहे, अंगाचा दाह होत आहे. तसेच माझे मन भ्रमिष्टासारखे झाले आहे. त्यामुळे मी उभा देखील राहू शकत नाही. ।१-३० ।


निमित्तानि च पश्यामि
विपरीतानि केशव ।
न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा
स्वजनमाहवे । १-३१।

**अर्थ**

हे केशवा, मला विपरीत चिन्हे दिसत आहेत. युद्धात आप्तांना मारून कल्याण होईल, असे मला वाटत नाही. । १-३१ ।

## आरोग्य टिप्स

# दररोज सकाळी भिजवलेल्या खजूर खा



**सकाळची सुरुवात एका स्वादिष्ट आणि पौष्टिक नाश्त्याने होते. आणि जर तुम्ही तुमच्या नाश्त्यात भिजवलेल्या खजूरांचा समावेश केला तर तुमच्या आरोग्याला अनेक प्रकारे फायदा होऊ शकतो.**

**हाडे मजबूत बनवते**
**त्वचेसाठी फायदेशीर वजन कमी करण्यास उपयुक्त**
**रक्तातील हिमोग्लोबिनची पातळी वाढवते**
**हृदयासाठी फायदेशीर**
**ऊर्जेची पातळी वाढवते**
**पचन सुधारते**
**कसे सेवन करावे**

**सकाळी रिकाम्या पोटी ५-६ भिजवलेल्या खजूर खाल्ल्याने तुम्ही हे सर्व फायदे घेऊ शकता. तुम्ही ते दूध किंवा दह्यासोबत देखील खाऊ शकता.**



# मकर संक्रांतीचे धार्मिक व वैज्ञानिक महत्व

सूर्य जेव्हा एका राशीतून दुसऱ्या राशीत प्रवेश करतो तेव्हा त्याला ज्योतिषात संक्रांत म्हंटले जाते. मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर सूर्याचा मकर राशीत प्रवेश होतो. एका संक्रांतीपासून दुसऱ्या संक्रांती पर्यंतचा काळ हा सौर मास (महिना) म्हणून ओळखला जातो. पौष महिन्यात सूर्य उत्तरायण होऊन मकर राशीत प्रवेश करतो ही गोष्ट देशभर वेगवेगळ्या प्रांतात वेगवेगळ्या प्रकारे उत्सव म्हणून साजरी केली जाते. मकर संक्रांती हा सण उत्तर भारतात दरवर्षी १४ जानेवारीला साजरा केला जातो.

**मकर संक्रांतीला उघडते स्वर्गाचे द्वार**

असे मानले जाते की, संक्रांतीपासून चांगल्या दिवसांची सुरुवात होते. त्याचे कारण म्हणजे सूर्य या दिवसात दक्षिण ते उत्तर गोलार्धात फिरत असतो. यामुळे देवतांच्या दिवसांची सुरुवात होते. धार्मिक मान्यतेनुसार या दिवशी स्वर्गाचे दार उघडते. म्हणूनच या दिवशी केलेले पुण्य व दान हे इतर दिवशी केलेल्या दानापेक्षा अधिक फलदायी असते.

**भीष्म पितामह यांनी या दिवसाची निवड केली**

मकर संक्रांतीच्या दिवशी शुध्द तूप आणि शाल याचे दान केल्यास मोक्षप्राप्ती होते. महाभारत काळात भीष्म पितामह यांनी देहत्याग करण्यासाठी मकर संक्रांतीचा दिवस निवडला होता. गीतेत सांगितले आहे की, जो माणूस उत्तरायणात शुक्ल पक्षात देहत्याग करतो त्याला मुक्ती मिळते. मकर संक्रांतीपासून सूर्य उत्तरायण होतात म्हणून हा दिवस लोकं आनंद- उत्साहात साजरा करतात.

पुराणातील मकर संक्रांतीची कथा श्रीमद्भगवत तसेच देवी पुराणानुसार शनी महाराजाचे त्यांच्याच वडिलांशी वैर होते. कारण सूर्य देवाने त्याची आई छायाला त्याच्या दुसऱ्या बायकोचा संज्ञाचा मुलगा यमराजाशी भेदभाव करताना पहिले होते. या गोष्टीने नाराज होऊन सूर्य देवाने संज्ञा आणि त्यांचा मुलगा शनी याला स्वतःपासून वेगळे केले होते. म्हणून शनी व छाया यांनी सूर्य देवाला कुष्ठरोग्याचा शाप दिला होता.

**मकर संक्रांतीशी जोडलेले आहे सूर्य व शनीचे वरदान**

यमराज आपल्या वडिलांना सूर्यदेवाला कुष्ठरोगाने पछाडलेले बघून दुःखी झाले. यमराजने वडिलांना कुष्ठरोगापासून मुक्ती मिळवून देण्यासाठी कठोर तपस्या केली. परंतु सूर्याने रागात येऊन शनी महाराजाच्या घरी असलेली कुंभ राशी जिला शनी देवाची राशी मानले जाते ती जाळून टाकली. त्यामुळे शनी व त्याची आई छाया हिला हाल-अपेष्टा सहन करावी लागली. यमराजने आपली सावत्र आई आणि भाऊ शनी ला त्रासात असलेले पाहून त्यांच्या कल्याणासाठी वडिलांना सूर्य देवाला समजावण्याचा प्रयत्न केला. तेव्हा सूर्याने सांगितले की, शनी जेव्हा दुसऱ्या घरात म्हणजे मकर राशीत येईल तेव्हा शनीचे घर धन-धान्याने भरपूर असेल. यावर शनी महाराज प्रसन्न झाले व त्यांनी सांगितले की, मकर संक्रांतीला जे कोणी सूर्यदेवाची पूजा करतील त्यांना शनी दशेचे त्रास सहन करावे लागणार नाहीत.

**मकर संक्रांतीचे सामाजिक व वैज्ञानिक कारण**

मकर संक्रांतीचे वैज्ञानिक कारण म्हणजे सूर्य उत्तरायण झाल्याने प्रकृती मध्ये बदलांना सुरुवात होते. थंडीने गारठलेल्या लोकांना सूर्यदेवाच्या उत्तरायण होण्याने थंडीपासून बचाव होण्यास मदत होते. भारत हा कृषिप्रधान देश आहे. येथील सण-उत्सवाचे पर्व हे शेतीवर अवलंबून आहे. मकर संक्रांती अशा काळात येते जेव्हा शेतकरी रब्बी हंगामाची पेरणी करून खरीप हंगामाचे पीक मका, ऊस, शेंगदाणे, उडीद घरी घेऊन येतात. शेतकऱ्यांचे घर अन्नधान्याने भरून जाते. म्हणूनच मकर संक्रांतीला खरीप हंगामातील पदार्थांनी या पर्वाचे स्वागत केले जाते.

# मकर संक्रांतीला काळी साडी का नेसतात ?



मकर संक्रांत हा सण भारतात पुरातन काळापासून मोठ्या आनंदाने साजरा केला जातो. या दिवशी आपल्या ओळखीतल्या माणसांच्या हातावर तीळ-गूळ दिला जातो. अन् देताना 'तीळ गुळ घ्या, गोड गोड बोला' असं आर्वजून सांगितलं जातं. या दिवशी सगळयात महत्त्वाचं म्हणजे महिला एकमेकींना वाण देतात. हा दिवस नाती दृढ करण्यासाठी, नवीन नाती जोडण्यासाठी असतो.

मकर संक्रांतीच्या मुहूर्तावर सूर्याचा मकर राशीत प्रवेश होतो. पौष महिन्यात सूर्य उत्तरायण होऊन मकर राशीत प्रवेश करतो. ही गोष्ट देशभर वेगवेगळया भागात वेगवेगळया पध्दतीनं साजरी केली जाते. मकर संक्रांती हा सण उत्तर भारतात दरवर्षी १४ जानेवारीला साजरा केला जातो. मकर संक्रांतीला बहुतांश ठिकाणी काळे वस्त्र परिधान करतात. त्यामागच्या विशेष गोष्टी आता आपण जाणून घेऊया. असं म्हणतात की, सूर्य जेव्हा मकर राशीत प्रवेश करतो तेव्हा त्याची पत्नी छाया म्हणजे सावली हिने काळे वस्त्र परिधान केलेलं होतं. पुराणातील पुरातन कथेत असा उल्लेख आहे. तेव्हापासून मग काळया ठिपक्याची साडी नेसण्याची पद्धता रूढ झाली. या साडीला 'काळी चांद्रकळा' असेही म्हटले जाते. भारतीय संस्कृती प्रत्येक सण ज्या ऋतुमध्ये येतो, त्यानुसार तो साजरी करण्याची वेगवेगळी, परंपरा पद्धती असतात. आपल्याकडे काळा रंग अशुभ मानला जातो. मात्र मकरसंक्रांत हा एकमेव सण आहे की ज्याला काळे कपडे परिधान करून साजरा केला जातो. काळया रंगाची वस्त्रे ही बाहेरची ऊष्णता शोषून घेऊन शरीर उबदार ठेवतात म्हणून थंडीमध्ये येणाऱ्या या सणाला म्हणजेच मकर संक्रांतीला काळया रंगाची वस्त्रे नेसण्याची प्रथा आहे.

त्यामुळे संक्रांत जवळ आली की बाजारांमध्ये महिलांसाठी काळया साड्या आणि काळी झबली,तर पुरुषांकरिता काळे कुर्ते दिसू लागतात.नवीन लग्न झालेल्या मुलीसाठी या सणाचे विशेष महत्व असते. नवविवाहित वधूच्या पहिल्या संक्रांतीला तिला काळी साडी भेट दिली जाते. काळे कपडे का घालतात. यामागचं वैज्ञानिक कारण बघितलं तर ज्याप्रकारे पांढरा रंग किंवा हलके रंग उष्णता परावर्तित करतात अर्थात उष्णता शोषून घेत नाही, त्याउलट काळा रंग हा ऊष्णता शोषून घेतो. मकर संक्रांत सण हिवाळयात येत असल्यामुळे काळया रंगाची वस्त्रे शरीराला उब देण्यासाठी फायदेशीर ठरतात. तसंच लग्नानंतर किंवा अपत्य झाल्यावर पहिली संक्रात म्हणून हलव्याचे दागिने घालून सण थाटात साजरा केला जातो. काळया रंगावर पांढरे शुभ्र हलव्याचे दागिने देखील उठून दिसतात, म्हणून मग काळया रंगाची वस्त्र परिधान करण्याची प्रथा आहे. आवक वाढल्यामुळे मासळीचे भाव कोसळले **www. esakal.com** मकरसक्रांतीचे पौराणिक कथेतही महत्त्व आहे. मकरसंक्रांतीच्याच दिवशी गंगा नदीचे आगमन पृथ्वीवर झाले होते, अशी आख्यायिका आहे. जानेवारीतील पहिला सण म्हणजे मकर संक्रांती आणि ज्योतिष शास्त्राप्रमाणे या दिवशी सूर्य धनु राशीतून मकर राशीत प्रवेश करतो. सूर्याच्या एका राशीतून दुसऱ्या राशीत संक्रमण होणे याला संक्रांत असं म्हणात. मकर संक्रांतीला उत्तरायण म्हणून देखील संबोधलं जातं. मकर संक्रांतीच्या दिवशी रात्र मोठी असते. या दिवसापासून तिळ तिळ दिवस वाढू लागतो म्हणजे दिनमान वाढायला सुरुवात होते. काळोख्या मोठ्या रात्रीला काळया रंगाची वस्त्रे नेसून निरोप देण्याची परंपरा आहे.

# दिवसा काम, रात्री अभ्यास... स्वप्नांचा केला पाठलाग



यूपीएससी सिव्हिल सर्व्हिस परीक्षा जगातील सर्वात कठीण परीक्षांच्या यादीत समाविष्ट आहे. बहुतेक उमेदवार यूपीएससी परीक्षेची तयारी करण्यासाठी कोचिंगची मदत घेतात. पण काही लोकांनी कोचिंगशिवाय यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण केल्याच्या कौतुकास्पद घटनाही समोर आल्या आहेत. बिहारच्या रहिवासी असलेल्या आणि बिहार केडरमध्ये तैनात असलेल्या आयएएस श्वेता भारती यांची यशोगाथा सर्व तरुणांसाठी प्रेरणादायी आहे. श्वेता भारती यांनी यूपीएससी परीक्षेपूर्वी बीपीएससी परीक्षा उत्तीर्ण केली होती. पण त्यांचं स्वप्न आयएएस अधिकारी होण्याचं होतं आणि म्हणूनच नोकरी मिळूनही त्यांनी कठोर परिश्रम सुरू ठेवले. ९ तास काम करून स्पर्धा परीक्षेची तयारी केली आणि नंतर मोठं यश मिळवलं.श्वेता भारती यांचा जन्म बिहारमधील नालंदा जिल्ह्यात झाला. लहानपणापासूनच त्या अभ्यासात खूप हुशार होत्या. त्यांनी पटना येथील इशान इंटरनॅशनल पब्लिक स्कूलमधून बारावीपर्यंतचं शिक्षण पूर्ण केलं. यानंतर भागलपूर अभियांत्रिकी महाविद्यालयातून इलेक्ट्रिकल आणि टेलिकम्युनिकेशनमध्ये बी.टेक पदवी प्राप्त केली. अभियांत्रिकीचे शिक्षण पूर्ण केल्यानंतर, त्यांना देशातील टॉप कंपन्यांपैकी एक असलेल्या विप्रोमध्ये नोकरी मिळाली. श्वेता यांना अधिकारी व्हायचं होतं. म्हणूनच त्यांनी खासगी नोकरीसोबतच सरकारी नोकरीची तयारी सुरू केली. कुटुंबाची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता, त्या नोकरी सोडण्याचा निर्णय घेऊ शकत नव्हत्या. श्वेता भारती दिवसा काम करायच्या आणि रात्री अभ्यास करायच्या. अशाप्रकारे काम करताना त्यांनी आपलं ध्येय साध्य करण्याचं स्वप्न पूर्ण केलं आहे.२०२० मध्ये झालेल्या बीपीएससीच्या ६५ व्या परीक्षेत श्वेता भारती यांनी ६५ वा रँक मिळवला होता. यानंतर त्यांना प्रोग्राम ऑफिसर (डीपीओ) म्हणून सरकारी नोकरी मिळाली. बीपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरही यूपीएससी नागरी सेवा परीक्षेची तयारी सुरू ठेवली. अखेर त्यांच्या मेहनतीचं चीज झालं आणि त्या २०२१ मध्ये यूपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्या. श्वेता भारती या सध्या बिहारमधील भागलपूर येथे सहाय्यक जिल्हाधिकारी म्हणून कार्यरत आहेत.




# तिळगुळ घ्या... गोड गोड बोला...

भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकर संक्रात हा त्यापैकीच एक सण. मकर संक्रात हा वर्षातील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. मकर संक्रांत हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. आपल्या महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्व दिले जाते. मकर संक्राती म्हणजे सूर्याने मकर राशीत प्रवेश करणे. सूर्य ज्या दिवशी दक्षीयणातून उत्तरायणात मार्गक्रमण करतो त्या तिथीला मकर संक्रांत साजरी केली जाते. ही तिथी कधी १४ जानेवारीला येते तर कधी १५ जानेवारीला येते. यावर्षी ही तिथी १४ जानेवारीला आली आहे. संक्रात ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तीळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगुळ वाटला जातो. संक्रातीच्या दिवशी तीळ आणि गूळ यांच्या वड्या किंवा लाडू एकमेकांना देण्याची पद्धत आहे. तिळगुळ देताना तिळगुळ घ्या गोड गोड बोला असा संदेशही दिला जातो. एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तीळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे प्रतिकात्मक रूपही या सणाला आहे. एकमेकांशी असलेली कटुता भांडण विसरून एकत्र येण्याचा संदेश देणारा हा सण आहे. मकर संक्रातील विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी कुंकू लावून सौभाग्याचे वान देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे. पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रातीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. मकर संक्रांत हा सण महिलांचा सण असे मानले जात असले तरी लहान मुलेही या सणाची आतुरतेनं वाट पाहत असतात. मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे. अनेक गावात पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची, आकाराची पतंगे उडताना दिसतात. पतंगाचे विविध आकार रंग पाहून मन प्रसन्न होते. एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकर संक्रात म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकर संक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! तिळगुळ घ्या गोड गोड बोला!!

**- श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**

# मॉर्निंग की इव्हिनिंग वॉक जास्त फायदेशीर?



चालणं हा एक साधा पण अतिशय परिणामकारक व्यायाम आहे, ज्यांना जिमचा खर्च परवडत नाही त्यांनी किमान चालायला हवं. यामुळे हृदयाचं आरोग्य सुधारतं, वजन नियंत्रित करणं सोपं होतं आणि हाडे, स्नायू मजबूत होतात. एकूणच आपण असं म्हणू शकतो की, चालणं हे आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. पण मॉर्निंग वॉक चांगला की इव्हिनिंग वॉक हा प्रश्न अनेकदा पडतो. मॉर्निंग वॉकचे फायदे सकाळी तुम्ही अनेकदा रिकाम्या पोटी चालत असता आणि यामुळे कॅलरी बर्न होण्यास मदत होते. मॉर्निंग वॉक शरीर आणि मन ताजेतवानं करतं, तर दिवसाच्या सुरुवातीच्या तासात ताजी हवा आणि सूर्यप्रकाश संपूर्ण दिवसासाठी तुमचा मूड सुधारण्यास मदत करतं. सकाळचा सूर्यप्रकाश हा व्हिटॅमिन डीचा नैसर्गिक स्रोत आहे.व्हिटॅमिन डी हाडांचे आरोग्य आणि रोगप्रतिकारक कार्यामध्ये खूप महत्त्वाची भूमिका बजावतं. जे लोक मॉर्निंग वॉक करतात त्यांना नेहमीच फायदा होतो. ज्यांना सकाळी उत्साही वाटत नाही त्यांच्यासाठी हे खूप उपयुक्त ठरू शकतं. यामुळेच विद्यार्थी आणि नोकरी करणाऱ्या लोकांसाठी मॉर्निंग वॉक बेस्ट आहे. इव्हिनिंग वॉकचे फायदे संध्याकाळ तुम्हाला तणावमुक्त राहण्यास मदत करते.

चालण्यामुळे एंडोर्फिन बाहेर पडतं, जे तणाव कमी करतं आणि मूड सुधारतं, ज्यांना कामातून किंवा मानसिक थकव्यापासून आराम हवा आहे अशा लोकांसाठी हा एक परिपूर्ण व्यायाम बनतो. रात्रीच्या जेवणानंतर चालणं पचनास मदत करतं आणि पोट फुगण्यास प्रतिबंध करतं.

ज्यांना अपचनाचा त्रास होतो किंवा जेवणानंतर जडपणा जाणवतो त्यांच्यासाठी हे खूप महत्वाचं आहे. संध्याकाळी चालण्यासारख्या हलक्या व्यायामामध्ये गुंतल्याने तुमच्या शरीराला फायदा होऊन चांगली झोप येऊ शकते. निद्रानाश आणि अनियमित झोपेच्या पद्धती असलेल्या लोकांसाठी, संध्याकाळी चालणं फायदेशीर ठरू शकतं. मॉर्निंग की इव्हिनिंग वॉक... शरीरासाठी काय फायदेशीर? सकाळ आणि संध्याकाळ चालण्याने हृदयाचं आरोग्य, वजन नियंत्रण आणि स्टॅमिना वाढतो. वेळेनुसार परिणाम बदलू शकतात. रिकाम्या पोटी मॉर्निंग वॉक केल्याने कॅलरी बर्न करण्याची शक्यता जास्त असते, तर संध्याकाळी चालणं पचन आणि जेवणानंतरच्या ग्लुकोजच्या पातळीला नियंत्रित करण्यासाठी अधिक प्रभावी असतं.मॉर्निंग वॉक निरोगी मनासाठी उत्तम आहे तर दिवसभरात निर्माण झालेला ताण कमी करण्यासाठी संध्याकाळी चालणं उत्तम आहे. तुमच्यासाठी काय चांगलं आहे ते तुमच्या गरजांवर अवलंबून आहे, पण एक गोष्ट निश्चित आहे की, जेव्हा तुम्हाला वेळ मिळेल तेव्हा तुम्ही नक्कीच चालत जा.

## रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्टच्या वतीने 'गुणवंतांचा सत्कार




दै.ठाणे जीवनदिप वार्ता/डोंबिवली(शरद शहाणे)

रविवार ११ जानेवारी २०२५ रोजी सायंकाळीं सहा वाजता रोटरी क्लब डोंबिवली ईस्ट यांच्यावतीने यशस्वी व्यवसायिकांचा त्यांच्या सामाजिक कार्याचा गुणगौरव कार्यक्रम आयोजित केला होता. रोटरी क्लब ऑफ डोंबिवली ईस्टचे अध्यक्ष माधव सिंग आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी दिपप्रयोजन करून कार्यक्रमाला सुरुवात केली.

अध्यक्ष माधव सिंग यांनी डी जी दिनेश मेहता यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मान केला . त्याचबरोबर सर्व मान्यवरांचा आणि सत्कारमूर्तीचा सत्कार करण्यात आला.अध्यक्ष माधव सिंग यांनी आपले मनोगत व्यक्त केले. समाजातील गुणवंतांनी आपापल्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य सामाजिक बांधिलकी राखून केल्याबद्दल त्यांचा कौतुकास्पद गौरव करण्यात आला.

डॉक्टर अनघा उपासनी कार्डिओलॉजिस्ट दापोली येथे साडेपाच हजार ऑपरेशन्स केले.प्राची गडकरी सुप्रसिद्ध नाट्य, सिने कलाकार, लेखक कवी वगैरे सुरेखा भोसले यादव पहिली महिला लोको सेंट्रल रेल्वे, पायलट भारतातली आणि (आशियातील) मृत्युंजय शुक्ला आणि त्यांची टीम मोफत अस्वच्छता अभियान, अनिता भुजबळ रिक्षा व्यवसाय. कविता कांगणे रिक्षा व्यवसाय सौ अर्चना आणि श्री गणराज जैन अपंग प्राण्यांचे सेवा बदलापूर येथे प्राण्यांचे हॉस्पिटल अशा अनेक यशस्वी व्यवसायिकांनी सामाजिक बांधिलकी राखून समाजाची मोफत सेवा केली याबद्दल त्यांना शाल श्रीफळ पुष्पगुच्छ आणि स्मृतिचिन्ह देऊन गौरवण्यात आले.

## ईपीएल कंपनीकडून शाळांना बेंचेस उपलब्ध




दै.ठाणे जीवनदीप वार्ता/शहापूर ग्रामिण(नरेंद्र पाटील)- वासिंद येथील ईपीएल कंपनी कडून विविध शाळांना बेंचेस उपलब्ध करून देण्यात आले आहे.

ईपीएल लिमिटेड या कंपनीने सामाजिक बांधिल की जपत येथील भक्ती संगम विद्यालय दलखन तसेच जिल्हा परिषद शाळा अंबर्जे व भातसई या शाळांमध्ये कंपनीचे जन संपर्क अधिकारी कमलाकर जाधव यांच्या हस्ते बेंचचे वाटप करण्यात आले.सदर बेंच हे टाकाऊ प्लास्टिकचे रिसायकलिंग करून बनवले असल्याने कंपनी वातावरणातील प्रदुषण कमी करण्याचे महत्त्वाचे काम करत आहे. तसेच काही महिन्यांपूर्वी येथील वाहतूक नियंत्रित करण्यासाठी पोलिस ठाण्यात अद्ययावत असे सुरक्षा बॅरीकेट्स उपलब्ध करून दिले होते. तर परिसरातील गांवपाड्यांना पाणी व इतर समस्या सोडविण्यासाठी विकास कामांना प्राधान्य दिले आहे.

## खासदार सुरेश म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत शासकीय दाखले शिबीर

दै.ठाणे जीवनदिप वार्ता/कल्याण(प्रतिनिधी)

भिवंडी लोकसभेचे खासदार सुरेश म्हात्रे यांच्या वाढदिवसानिमित्त, १५ जानेवारी रोजी स्वीट सीमा सोसायटी, शहाड पश्चिम येथे प्रथमेश सिंह यांच्या वतीने मोफत शासकीय दाखले शिबिर आयोजित करण्यात आले आहे. या शिबिरात नागरिकांना मोफत आधार कार्ड, डोमिसाइल प्रमाणपत्र, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र, आणि रहिवाशी प्रमाणपत्र मिळवण्याची संधी मिळेल. या शिबिरात आधार कार्ड, डोमिसाइल प्रमाणपत्र, ज्येष्ठ नागरिक प्रमाणपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र आदी दाखले मिळणार आहेत.

## म्हसा विद्यालयात राष्ट्रमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती साजरी

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
मुरबाड(बाळासाहेब भालेराव)

मुरबाड तालुक्यातील वीर हुतात्मा भाई कोतवाल विद्यालय,म्हसा या विद्यालयात राष्ट्रमाता जिजाऊ आणि महान तपस्वी तथा युगपुरुष स्वामी विवेकानंद यांची जयंती मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली.



जायंती निमित्ताने रांगोळी स्पर्धा,निबंध स्पर्धा,घेण्यात आल्या. यामध्ये ८वी,९वी,१०वी मुला-मुलींनी भाग उत्स्फूर्तपने भाग घेतला.निबंध स्पर्धेत-वेदिका आखाडे,ओमकार मुरबाडे, देवानंद घरत, प्रीति घरत,वेदिका रातांबे ,तसेच भाविक रातांबे,साकेत शिंदे,जयदीप कुर्ले,महेश्वरी वागट, यांनी भाषणे दिलित. तर अजय धुमाळ, करण घरत,यानी गीते सादर केली.तसेच १० वी ब प्रथम,व्दितीय आणि १०वी अ तृतीय क्रमांक मिळाला.स्पर्धा घेवून तिसऱ्या दिवसी लगेच बक्षीसे वाटप करण्यात आलेत.

राष्ट्रमाता जिजाऊ ह्या शिवाजी महाराजांच्या गुरु होत्या म्हणून शिवबा हे आदर्श छत्रपति राजे झालेत. आई आणि सुपुत्राचा हा इतिहास देश नव्हे तर सारे जगाला माहित आहे. तसेच युगपुरुष स्वामी विवेकानंद हे देखील तमाम युवकांचे श्रद्धा स्थान आहेत.त्यांचे शिकागो व्याख्याने बोधप्रद आहेत.असे गौरवोदगार डॉ चंद्रमणी मोहिते यांनी आपल्या भाषाणातून व्यक्त केलेत. कार्यक्रमाचे प्रस्ताविक व सूत्रसंचालन महेंद्र बेंद्रे यांनी केले तर जगन्नाथ कथोरे, सारीखा कडाळी,विद्या बैरागी, धनश्री साबळे, भानूदास लोहार, सुनिल रेंघे,पूजा कुर्ले, भानूदास घागस ,राहुल प्रधान, आणि रमा पष्टे उपस्थित होते. शेवटी वंदे मातरम गिताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## डिलिव्हरी बॉयकडून वाहतूक नियमांचे उल्लंघन

दै.ठाणे जीवनदिप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी)

कल्याणमध्ये डिलिव्हरी बॉइजचा अनोखा कारनामा पहायला मिळाला असून लवकर डिलव्हरी पोहचविण्यासाठी वाहतूक नियमांचे उल्लंघन या डिलिव्हरी बॉइजकडून केले जात असून कारवाई टाळण्यासाठी आपल्या दुचाकीच्या नंबर प्लेटवर स्टीकर लावतात. याकडे आरटीओ आणि वाहतूक विभागाचे दुर्लक्ष होत असून हा सर्व प्रकार मनसेचे शाखा अध्यक्ष नीलेश जगदाळे यांनी व्हीडीओच्या माध्यमातून उघडकीस आणला आहे.



वाहतूक नियमांचे उल्लंघन केल्यानंतर येणारे चलान आणि होणारी कारवाई टाळण्यासाठी कल्याणमध्ये अनेक डिलिव्हरी बॉइजने अनोखी शक्कल लढवली आहे. कमी वेळेत डिलिव्हरी करण्यासाठी सिग्नल तोडून, वाहतूक नियमांचे उल्लंघन करून हे डिलिव्हरी बॉइज काम करत असतात. मात्र हे करतांना शहरातील सिग्नल वर लावलेल्या सिसिटीव्ही कॅमेराच्या माध्यमातून कारवाई होऊन चलान येउ नये किंवा पोलिसांची कारवाई टाळण्यासाठी हे डिलिव्हरी बॉइज आपल्या गाडीच्या नंबरप्लेट वरील एका नंबरला स्टीकर लावून फिरत आहेत. हा सर्व प्रकार मनसेचे शाखा अध्यक्ष नीलेश जगदाळे यांनी समोर आणला आहे. सोशल मिडियावर व्हीडीओ बनवत त्यांनी हि पोलखोल केली आहे.

कल्याणमध्ये विविध कंपन्यांचे डिलिव्हरी बॉय डिलिव्हरी करण्यासाठी दुचाकी वापरतात. मात्र लवकरात लवकर डिलिव्हरी करण्यासाठी वाहतूक नियमांचे उल्लंघन करतात. हे करतांना आपल्या दुचाकीचा नंबर लपवतात जेणे करून त्यांच्यावर चलान किंवा कोणतीही कारवाई होऊ नये यासाठी करतात. एवढेच नव्हे तर हे ज्या ठिकाणी अथवा सोसायटी मध्ये डिलिव्हरी करतात त्याठिकाणी यांच्याकडून काही अप्रिय घटना घडल्यास याला जवाबदार कोण असा सवाल निलेश जगदाळे यांनी केला आहे.

तर या सर्व प्रकाराकडे आरटीओ आणि वाहतूक विभागाचे पूर्णतः दुर्लक्ष होत असून याबाबत वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक राजेश शिरसाठ यांना विचारले असता हि बाब एका तरुणाने निदर्शनास आणून दिली असून कल्याण मधील १० पॉइंटवर डिलिव्हरी बॉइजच्या गाड्यांची तपासणी करण्याच्या सूचना वाहतूक पोलिसांना केल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

## पालघर पोलीस दलाकडून 'रस्ता सुरक्षा अभियान २०२५'

दै.ठाणे जीवनदीप वार्ता
पालघर(ऋषीकेश जाधव)

पालघर / मोटार वाहन अपघातास परीणामकारकरित्या आळा बसावा व नागरीकांमध्ये वाहतुकीच्या नियमांचा प्रचार व प्रसार होण्याकरीता दरवर्षी संपूर्ण देशभरात 'रस्ता सुरक्षा अभियान ' आयोजित करण्यात येते. केंद्र शासनाच्या निर्देशानुसार यावर्षीही दि.०१ जानेवारी २०२५ ते दि. ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत ३६ वे रस्ता सुरक्षा अभियान २०२५ साजरा करण्याबाचत सुचित करण्यात आले आहे. त्याअनुषंगाने पालघर जिल्हा पोलीस व जिल्हा वाहतुक शाखा पालघर यांच्या वतीने दि. ०१ जानेवारी २०२५ ते दि. ३१ जानेवारी २०२५ या कालावधीत रस्ता सुरक्षा अभियान २०२५ संपूर्ण पालघर जिल्हयात राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने संपूर्ण जिल्हायात वाहतुक नियमांचाचत जनजागृती व्हावी याकरीता वेगवेगळे कार्यक्रम राबवुन जनजागृती करण्यात येत आहे.




'रस्ता सुरक्षा अभियान २०२५' च्या अनुषंगाने जिल्हयात वेगवेगळया जनजागृती कार्यक्रमाचे तसेच उपक्रमांचे आयोजन करण्यात येत असत पालघर जिल्हयांतील महत्वाचे ठिकाणी बॅनर्स लावणे व महत्वाच्या ठिकाणी चौकसभा घेवून वाहन चालकांना मोटार वाहन कायदा व सुरक्षितरित्या वाहन चालविण्याची माहिती देणे, बेकायदेशिर वाहन चालविणारे वाहन चालकांवर प्रतिबंध आणण्यासाठी विरुध्द दिशेने वाहन चालविणारे, हेल्मेट न परिधान करता वाहन चालविणे, वाहन चालविताना मोबाईलवर बोलणारे, सिग्नल तोडणारे लायसन्स नसणारे इसमांविरुध्द विशेष मोहिम राबवून कारवाई करणे , शालेय विद्यार्थ्यांचे प्रबोधन, रस्ते सुरक्षा विषयांवर शाळेतील विद्यार्थ्यांना शाळेत जावून प्रबोधन करणे , नागरीकांना लायसन्स व परवाना काढणेबाबत जनजागृती करणे,रस्ते सुरक्षेबाबत निबंध, चित्रकला तसेच प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करणे, वाहन चालकांसाठी वाहतूक प्रबोधपर कार्यशाळा आयोजित करणे, वाहन चालक व पोलीस अंमलदार यांचेसाठी ताणतणाव शिबिराचे आयोजन करणे., मोटारसायकल रायडर करणा-या वाहन चालकांना रस्ते सुरक्षेबाबत व ओव्हर स्पिड व इतर वाहतुक नियम तोडणा-या वाहन चालकांना वाहतुक नियमांचे जनजागृती मार्गदर्शन व प्रबोधन करणे, अपघातातील जखमींचा जिव वाचविणे व त्यांचेवर तातडीने उपचार करणे याबाबत मार्गदर्शन प्रबोधनपर जनजागृती कार्यक्रम करणे, महामार्गावरुन जाणा-या वाहनांना तसेच बैलगाड्यांना रिफ्लेक्टर लावणे, मुख्य रस्ते व महामार्गावर, हद्दीतील रुग्णालये, ॲम्ब्युलन्स, क्रेन, स्थानिक पोलीस ठाणे, यांचे दुरध्वनी क्रमांकांचे बोर्ड लावणे, पालघर बोईसर मधील एस.टी. डेपो येथे वाहन चालकांसाठी कार्यशाळा आयोजन करुन वाहतुक नियमांची माहिति देऊन वाहतुक नियमांची जनजागृती करणे, बाईक रॅली काढून वाहतुक नियमांची जनजागृती करणे, 'रस्ता सुरख्क्षा अभियान २०२५' च्या अनुषंगाने वाहतुक नियमांची जनजागृती व्हावी याकरीता जिल्हयात सर्व वाहतुक विभागांमध्ये महत्वाचे चौकात विना लायसन्स वाहन चालवु नये, वाहन चालवितांना मोबाईलचा वापर टाळा, वाहनात मोठ्या आवाजात गाणे वाजवु नका, वेग मर्यादेचे पालन करा, विना नंबरचे वाहन चालवू नये, वाहतुक नियमांचे उल्लंघन करु नये, सीट बेल्टचा वापर करा. याबाबतचे बॅनर लावण्यात आलेले असून वाहतुक नियमांची जनजागृती करण्यात येत आहे.पालघर जिल्हयातील सर्व वाहतुक विभागातील शाळा/ महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचे रस्ता सुरक्षा या विषयांवर शालेय विद्यार्थ्यांना वाहतुक नियमांचे मार्गदर्शन व प्रयोधन करण्यात आलेले असुन जनजागृती करण्यात येत आहे.जिल्हयातील पालघर, बोईसर विभागातील महत्वाचे चौक तसेच सर्व महत्वाचे चौक याठिकाणी तीन चाकी रिक्षा, डमडम, इको, इत्यादी वाहन चालकांची चौक सभा आयोजित करुन वाहन चालकांना मोटार वाहन कायदा व सुरक्षितरित्या वाहन चालविण्याची माहीती देऊन वाहतुक नियमांची जनजागृती करण्यात येत आहे. सर्व दुचाकी विना हेल्मेट वाहन चालकांना पुष्प गुच्छ देऊन दुचाकी चालवितांना हेल्मेटचा वापर करावा याचाबत आवाहन करून जनजागती करण्यात येत आहे.

पालघर, बोईसर येथील एस.टी. डेपो वाहन चालकांसाठी कार्यशाळा आयोजीत करुन वाहतुक नियमांबाबत जनजागृती करण्यात आलेली आहे.बाळासाहेब पाटील, पोलीस अधीक्षक, पालघर यांनी जिल्ह्यातील सर्व नागरीकांना असे आवाहन केले आहे की, रस्ता सुरक्षिततेविषयी जनजागृती करण्यासाठी रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत हे सर्व उपक्रम राबविण्यात येणार असुन सदरचे अभियान यशस्वी करण्याकरीता सर्व नागरीकांनी वाहतुकीच्या नियमांचे पालन करुन पोलीसांना सहकार्य करावे.

## शहापूर बोरशेती येथे जिजाऊ जन्मोत्सव उत्साहात संपन्न



दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ मुरबाड(प्रतिनिधी)

कुणबी समाजोन्नती संघ, मुंबईच्या शहापूर तालुका शाखेच्या कार्यकर्त्यांच्या वतीने गेले सलग ८ वर्षे हा कार्यक्रम आयोजित केला जातो.यावर्षी सदर कार्यक्रमाचे आयोजन शाखा उपाध्यक्ष शिवश्री केशव करण सर यांचे अध्यक्षतेखाली बोरशेती गावात केले गेले होते. कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून क्रांतिसिंह नाना पाटील यांचे नातू शिवश्री. आनंदराव मोरे,पणतू उद्धव मोरे व कुटुंब,कॉम्रेड शंकर भोईर,किसन बाबा भेरे यांचे नातू मा.रमेश भेरे, अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे ठाणे जिल्हा सचिव शिवश्री. दादाजी यशवंतराव,डॉ.रामचंद्रजी देसले,जेष्ठ नागरिक रामचंद्र ठाकरे,सुनिता बांगर,शिवसेना शहापूर तालुका अध्यक्ष प्रकाशजी वेखंडे, कृ. उ. बा. समिती संचालक वामनशेठ गायकर,सरपंच रविंद्र हिलम, बाळू भागरे, एकनाथ देसले सर तसेच बोरशेती-कळंभे गावातील महिला भगिनी, जेष्ठ नागरिक, युवा व बालवर्ग,निमंत्रित अतिथी,दिनदर्शिकेचे साहाय्य कर्ते,तसेच शहापूर शाखेचे केंद्रीय पदाधिकारी,महिला कमिटी,विभागीय पदाधिकारी व कार्यकारिणी सदस्य असे जवळपास ४०० हून अधिक समाजबांधव उपस्थित होते. प्रमुख वक्ते शिवश्री.सुनिल जी देवरे सर आणि शिवमती. भक्ति विशे (फर्डे )यांनी जिजाऊ-सावित्री- स्वा. सै. किसनबाबा भेरे -क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या सामाजिक, सांस्कृतिक,वैचारिक कार्याचा दैदिप्यमान इतिहास उपस्थित जनसमुदायास अवगत केला. शाखेच्या वतीने १०० हून अधिक जेष्ठ ग्रामस्थांचा सन्मान करण्यात आला.

महिलांचा हळदीकुंकू कार्यक्रम पार पडला तसेच शाखेच्या दिनदर्शिकेचे प्रकाशन उपस्थित मान्यवर जाहिरातदारांचे हस्ते करण्यात आले.कार्यक्रम यशस्वी नियोजन शाखेचे सहखजिनदार शिवश्री. विलास विशे, कार्यकारिणी सदस्य अशोक बांगर,विभाग सचिव चंद्रकांत निचिते, उपाध्यक्ष लक्ष्मण भागरे,अनंता निपूर्ते, प्रशांत वाळिंबे,गणेश धलपे, लक्ष्मण किरपण,पंकज वाळिंबे या शहापूर विभागाच्या सदस्यांनी केले.बोरशेती खुर्द व बोरशेती बुद्रुक गावांतील अनेक ग्रामस्थांनी कार्यक्रमासाठी सढळ हस्ते सहकार्य केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक खजिनदार नामदेव तिवरे व सूत्रसंचालन सहसचिव प्रसाद फर्डे यांनी केले तर छायाचित्रण सचिव उमेश पाटील यांनी केले.

## जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती दिनी महापालिकेतर्फे अभिवादन



दै.ठाणे जीवनदिप वार्ता
कल्याण(प्रतिनिधी)

जिजाऊ माँ साहेब व स्वामी विवेकानंद यांच्या जयंती दिनानिमित्त महापालिका मुख्यालयात त्यांच्या प्रतिमेस माहिती व जनसंपर्क विभागाचे उपायुक्त संजय जाधव यांच्या शुभहस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या समयी उपस्थित माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे, उपअभियंता श्याम सोनवणे तसेच इतर कर्मचारी वर्ग यांनी देखील त्यांच्या प्रतिमेस पुष्पसुमने अर्पण करुन अभिवादन केले.तद्नंतर पारनाका, कल्याण (पश्चिम) येथे असलेल्या स्वामी विवेकानंद यांच्या पुतळयास उपायुक्त संजय जाधव, माहिती व जनसंपर्क अधिकारी माधवी पोफळे यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यासमयी सौरभ कुळकर्णी, शंभू पंडित, सारंग केळकर , प्रवीण शहाणे , मिलिंद रेडे, संदीप पळणीटकर व इतर नागरिक उपस्थित होते. डोंबिवली येथील महापालिकेच्या जुन्या विभागीय कार्यालयाजवळील स्वामी विवेकानंद यांच्या पुतळयास फ प्रभागाच्या सहा. आयुक्त हेमा मुंबरकर यांचे हस्ते पुष्पहार अर्पण करुन अभिवादन करण्यात आले. यावेळी डोंबिवली विभागीय कार्यालयातील इतर कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.

## अरविंद गुरव यांची उद्योग व्यवसायात उत्तुंग भरारी - बंडू खंडागळे




दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता
पेण(प्रतिनिधी)

रायगड जिल्ह्यातील पेण तालुक्यातील नव्या उमेदीने तयार झालेला उद्योजक अरविंद कमलाकर गुरव यांची विस्क क्लिनिंग प्रॉडक्ट्स स्वामी जनरल स्टोअर्स या नावाने घरामध्ये नित्यप्रमाणे वापरल्या जाणाऱ्या साफसफाई साठी रोजच्या वापरात लागणाऱ्या क्लिनिक प्रॉडक्ट्स चा स्वतःचा कारखाना पेण येथे असून स्वामी समर्थ जनरल स्टोअर्स या नावाने पेण तालुक्यांमध्ये त्यांचे सेल्फ काउंटर आज नव्याने आज १३ जानेवारी २०२५ रोजी पेण शहरात छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे सेल्फ सेल काउंटर सुरू झाले आहे. या सेल्फ काऊंटरच्या माध्यमातून मापक दरामध्ये पेण शहरातील त्याचबरोबर तालुक्यातील लोकांना घरगुती साफसफाई साठी लागणाऱ्या वस्तू मिळणार आहेत. त्यांच्या या उद्योगाचा फायदा गुरव समाजातील तरुण होतकरू सुशिक्षित बेकार त्याचबरोबर नव्याने व्यवसाय करू पाहणारे तरुण आणि महिला वर्गासाठी भविष्य काळामध्ये होईल. संपूर्ण महाराष्ट्र नव्हे तर जिल्हा जिल्ह्यातून प्रत्येक गुरव समाज बांधवाला या कंपनीची माफक दरात अधिकृत कंपनीचे सेल्फ काऊंटर सुरू करण्यासाठी एजन्सी देऊन प्रयत्न करणार असल्याचे सांगून अरविंद गुरव यांनी उतुंग भरारी घेतली असे ही बंडू खंडागळे यांनी सांगितले.

## राज्यस्तरीय अनुभूती सेवा रत्न पुरस्काराने मुकेश दामोदरे सन्मानित



दै.ठाणे जीवनदीप वार्ता/ शहापूर ग्रामिण (प्रतिनिधी)

नुकताच मुंबई येथे मराठी पत्रकार संघ भवन मध्ये शानदार पद्धतीने पार पडलेल्या टी एन जी क्रियेशन आणि इनोटिव्ह मानबिंदू प्रकाशन यांच्या संयुक्त विद्यमाने पार पडलेल्या राज्यस्तरीय अनुभूती जनसेवा पुरस्कार सोहळयामध्ये वासिंद येथील सरस्वती विद्यालया तील विद्यार्थी प्रिय शिक्षक मुकेश दामोदरे यांना मानाचा राज्यस्तरीय अनुभूती जनसेवा पुरस्काराने दिग्गज मान्यवर यांच्या शुभहस्ते सन्मानित करण्यात आले. सदर हा पुरस्कार शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना बहाल करण्यात आला आहे. मुकेश दामोदर हे गेली अनेक वर्ष शाळाबाह्य उपक्रम राबवत असून अनेक स्पर्धा परीक्षांचे नियोजन करत आहेत.

अनेक संस्थांवर कार्यरत असून सेवाभावी वृत्ती जोपासण्यासाठी काम करीत आहेत. हा पुरस्कार प्राप्त झाल्याने एक ऊर्जा प्राप्त झाल्याचा त्यांनी सांगितले आहे. या पुरस्कार सोहळयासाठी सिनेसृष्टीतील कलावंत अभिनेत्री नयना आपटे, सुप्रसिद्ध स्त्री रोग तज्ञ शुभदा निल, राष्ट्रीय संरक्षण दलातील कर्नल रवींद्र त्रिपाठी बॉलीवूड ॲक्टर अभंस कुमार, हिंदी भाषा साहित्यिक सादिका नवाब आदी मान्यवर उपस्थित होते. हा पुरस्कार प्राप्त झाल्याने मुकेश दामोदरे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.



## मरीन ग्लोबल कल्चर कंपनीची फसवणूक




**पनवेल(प्रतिनिधी)** : मुंबई आणि नवी मुंबईतील नागरिकांना मोठ्या परताव्याचे आमिष दाखवून एक्वा मरीन ग्लोबल कल्चर कंपनीने फसवणूक केल्याचा प्रकार उघड झाला आहे. या प्रकरणात अंधेरीतील गुंतवणूकदार मोहम्मद इस्माईल शेख यांनी खारघर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. कंपनीने महिन्याला १५ टक्के परताव्याचे आश्वासन देत शेख यांच्याकडून १४ लाख रुपयांची गुंतवणूक घेतली होती. सुरुवातीचे काही महिने परतावा दिल्यानंतर कंपनीने तो थांबवला. तक्रार दाखल झाल्यानंतर खारघर पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास अंधेरी एमआयडीसी पोलिसांकडे वर्ग केला. मुंबई आणि नवी मुंबई पोलिसांनी कंपनीचे मालक विनय कांबळे यांना ताब्यात घेऊन मुंबई पोलिसांच्या स्वाधीन केले.

# मॅरेथॉनच्या माध्यमातून शहिद जवानांच्या कुटुंबाला मदत




**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)**

रविवारी कल्याण मधील अग्रणीय सामाजिक संस्था सी. एन. पाटील फाउंडेशन व रोटरी क्लब ऑफ कल्याण रीवरसाईड यांनी गांधारी रोड, कल्याण येथे शहीद जवान प्रवीण जंजाळ यांच्या नातेवाईकांना मदत करण्यासाठी आयोजित मॅरेथॉन मध्ये मोठी गर्दी होती. जवळपास २५०० च्यावर लोकांनी भाग घेऊन सहकार्य केले.

कार्यक्रम यशस्वी करण्यास सी. एन. पाटील फाउंडेशन, सी पी क्लब, कल्याण सामाजिक संस्था व रोटरी क्लब ऑफ कल्याण रीवरसाईड यांच्या सर्व कार्यकर्त्यांनी खूप मेहनत घेतली. सी. एन. पाटील फाउंडेशनचे अध्यक्ष चंद्रशेखर पाटील व रोटरी क्लब ऑफ कल्याण रीवरसाईड अध्यक्ष योगेश कल्हापुरे यांच्या मार्गदर्शनाने कार्यक्रम यशस्वी झाला. शहीद जवान प्रवीण जंजाळ यांच्या नातेवाईकांना ५१ हजारांचा धनादेश चंद्रशेखर नामदेव पाटील अध्यक्ष सी एन पाटील फाउंडेशन, प्रिया पाटील, योगेश कल्हापुरे, योगिता कल्हापुरे, जिग्नेश २५ हजार रुपये आदि मान्यवरांच्या हस्ते देण्यात आले. सी. एन. पाटील फाउंडेशन व संलग्न संस्थेतर्फे आतापर्यंत ११ शहीद जवानांच्या नातेवाईकांना कल्याण मध्ये बोलवून ४ लाख ५० हजार रुपयांची मदत करण्यात आली आहे.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी उपाध्यक्ष बापू शिंपी, सुधाकर पाटील, ज्योति कोरडे, सिमा पाटील, मिनाक्षी पाटील, मच्छिंद्र जाधव(डी बी ग्रूप), डॉ. जितेंद्र गुप्ता, विक्रांत महाजन, एन पी अय्यर, डॉ. प्रशांत पाटील, अशोक पवार, डॉ अमित झोपे, स्वाती तांबोळी, जयवंत पाटील, अमोल चौधरी, डॉ संजय वाघ, अनिता चौधरी, ॲड तृपती पाटील, ॲड जनार्दन टावरे, ॲड अविनाश पाटील, किशोर चौधरी, देवीदास पाटील, पी के आहिरे, कविश्वर आढव, सत्यप्रकाश गुप्ता, अविनाश इंगळे, दिनेश वसईकर,ॲड रवी प्रधान, रूपाली गीध, बाळासाहेब भोसले, वैशाली परदेशी, श्रीकांत फुलवणे यांनी मदत केली.पोलीस उपायुक्त अतुल झेंडे, कल्याण डोंबिवली उपायुक्त संजय जाधव, फोर्टीस हॉस्पिटल, वाहतूक पोलीस अधीकारी, अग्नीशमन दल, कल्याण वकिल संघटना, हर्षल जाधव, सुशील निकम, सुहास भोपी, गणेश चव्हाण, विनोद शेलकर, पोर्णिमा, रेश्मा कांबळे, डॉ. शिवानी तांबोळी, डॉ. कोमल भोईर, डॉ. वर्षा राठोड, मंगल सिंह परदेशी, संजय फुलझेले, पी एस खैरनार, हिरामण क्षीरसागर, नवनाथ धनवटे, प्रल्हाद तळेले, खुशी शेट्टी, सोनल ठाकरे, रेणुका पिसे, सुवर्णा राजपूत, मनिषा राव यांनी मेहनत घेतली.

### गरजू विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक निधी संकलनासाठी स्पंदनच्या वतीने

# 'गुलजार दी लिजेंड' संपन्न



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)**

गरजू होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी मदत देऊन माणुसकीची स्पंदने जपणाऱ्या 'स्पंदन' या संस्थेचा निधी संकल नासाठीचा पंचविसावा कार्यक्रम कल्याणच्या आचार्य अत्रे रंगमंदिरात नुकताच संपन्न झाला. मनोरंजनातून समाजकार्य करणाऱ्या या कार्यक्रमाला कल्याणकर रसिकांचा हाऊसफुल प्रतिसाद मिळाला वयाच्या नव्वदीतही ज्यांची प्रतिभा तितकीच तरुण आहे आणि चंदेरी झगमगाटी दुनियेतही आपल्या गीतांचा सुसंस्कृत राजस दर्जा ज्यांनी अबाधित राखला आहे, ते तमाम संगीत रसिकांचे आवडते गीतकार 'गुलजार' यांच्या गीतांचा 'गुलजार दी लिजेंड' हा कार्यक्रम रसिकांनी अक्षरशः डोक्यावर घेतला.

'आनेवाला पल जानेवाला है' या गाण्याने सुरुवात झालेल्या कार्यक्रमाने पुढचे जवळ जवळ तीन तास लोकांना वेळ विसरायला लावली. आलोक काटदरे, सोनाली कर्णिक, धनश्री देशपांडे आणि डॉ. जय आजगावकर या चारही सुरेल गायकांनी श्रोत्यांना अक्षरशः खिळवून ठेवले. संगीत संयोजन करणारे सत्यजीत प्रभू, प्रशांत लळित, बासरी वादक जाधव, गिटार वादक मिलिंद कुलकर्णी तसेच साथसंगत करणारे सर्वच वादक कलाकार यांचा सुरेख ताळमेळ हा या कार्यक्रमाचा अतिशय सुखावणारा भाग होता. कार्यक्रमात जवळ जवळ तीस गाणी सादर करताना या गाण्यांना एकत्र गुंफण्याच महत्वाचं काम करणारं अंबरिष मिश्रा यांचं निवेदन अप्रतिम होतं.

एक अतिशय श्रवणीय कार्यक्रम ऐकल्याचा आनंद सगळ्याच रसिक श्रोत्यांच्या चेहऱ्यावर दिसत होता. स्पंदनच्या भावी कार्यक्रमांनाही अशीच भरभरून साथ मिळेल व माणुसकीचा हा स्तुत्य उपक्रम नित्य चालू राहील अशी भावना स्पंदनचे सभासद प्रशांत दांडेकर यांनी व्यक्त केली.



**ॲड. हरेश इदनानी यांच्या वाढदिवसानिमित्त श्री. प्रकाश डांगळे यांनी सदिच्छा भेट घेतली तसेच जन्मदिनाच्या शुभेच्छा देऊन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# अंबरनाथमध्ये संभाजी ब्रिगेडचे राष्ट्रमाता जिजाऊंना अभिवादन

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता अंबरनाथ(प्रफुल केदारे) :**

स्वराज्य जिच्या कुशीत जन्माला आले त्या राष्ट्रमाता जिजाऊंच्या ४२७ व्या जयंती निमित्ताने शहरात अंबरनाथ संभाजी ब्रिगेडच्या वतीने अभिवादन करण्यात आले. शहरा तील हुतात्मा चौकामधिल कार्यालयात हा जयंती सोहळा पारंपरिक पद्धतीने साजरा झाला.

यावेळी जिजाऊंच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या ऐतिहासिक



शौर्य गाथांना उजाळा देण्यात आला. ' तुमचं आमचं नातं काय, जय जिजाऊ जय शिवराय ' या घोषणांचा जयघोष याप्रसंगी झाला. याकामी संभाजी ब्रिगेड अंबरनाथ शहराध्यक्ष सुनील अहिरे व कार्याध्यक्ष प्रफुल्ल थोरात यांनी पुढाकार घेतला. याक्षणी जिजाऊ जन्मोत्सव आरोग्य सप्ताहाचीही घोषणा झाली. या अनुषंगाने समाजातील कर्तृत्ववान महिलांसह विविध क्षेत्रांतील गुणवंत, कष्टकऱ्यांचा गौरव, गडपूजन, किल्ले चढणे स्पर्धा, व्याख्यान, शाहिरी पोवाडे, शिवकालीन शस्त्रास्त्र खेळ, पालखी मिरवणूक आदी कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

### भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेतर्फे

# अनधिकृतपणे ड्रेनेज लाइन घेणाऱ्यावर केली कारवाई





**दै.ठाणे जीवनदिप वार्ता भिवंडी(प्रतिनिधी)**

भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील मौजे ब्राह्मणआळी घर नं १३६, गणपती मंदिराचा मागे, ब्राह्मण आळी, भिवंडी येथे पाहणी केली असता त्याठिकाणी श्री. मेहमूद मोमीन यांनी मनपाची कोणतीही रीतसर परवानगी न घेता मानपाचा सार्वजनिक रस्ता खोदून तळ अधिक पाच मजली इमारतीकरिता अनिधिकृतपणे ड्रेनेज लाइन टाकण्याचे काम केले असल्याने त्यांचेवर निजामपूर पोलिस स्टेशन येथे भा. न्या. सं. **(B. N.S)** २०२३ चे कलम ३२४ (४), ३२४ (५), ३२६() व ३२६ (म) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला.

सदरची कारवाई मा. प्रशासक तथा आयुक्त श्री अजय वैद्य यांचे आदेशान्वये कार्यकारी अभियंता श्री संदीप पटणावर, पाणी पुरवठा विभाग यांचे मार्गदर्शनाखाली, उप अभियंता श्री सर्फराज अंसारी यांचे अधिपत्याखाली श्री विराज भोईर (पथक प्रमुख), नफीस मोमीन (सहा. पथक प्रमुख) यांचे मार्फत करण्यात आली.

### ठाणे व डोंबिवली परिक्षेत्रामध्ये

# २२ ठिकाणी भक्तीपर्व समागम संपन्न



**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)**

प्रतिवर्षाप्रमाणे याही वर्षी संत निरंकारी मिशनच्या वतीने देशभरात रविवारी भक्ती पर्वाचे आयोजन करण्यात आले. भक्ती पर्व संत समागमाचा मुख्य कार्यक्रम सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन छत्रछायेमध्ये संत निरंकारी आध्यात्मिक स्थळ, समालखा येथे संपन्न झाला. भक्तीपर्वाच्या निमित्ताने ठाणे शहर आणि कल्याण, डोंबिवली, भिवंडी, उल्हासनगर, बदलापुर परिसरामध्ये एकंदर २२ ठिकाणी विशेष सत्संग समारोहांचे आयोजन करण्यात आले ज्यामध्ये हजारोंच्या संख्येने स्थानिक भक्तगणांनी भाग घेतला.

समालखा येथील भक्तीपर्व संत समागमामध्ये सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज यांनी हजारोंच्या संख्येने उपस्थित विशाल जनसमुदायाला संबोधित करताना प्रतिपादन केले, की 'भक्ती अशी अवस्था आहे जी जीवनाला दिव्यत्व आणि आनंदाने ओतप्रोत करते. हा इच्छापुर्तीचा सौदा नाही किंवा स्वार्थाचे माध्यमही नाही. खऱ्या भक्तीचा अर्थ आहे परमात्म्याशी गहिरे नाते आणि निःस्वार्थ प्रेम।'

याप्रसंगी सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज व आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन सान्निध्यात श्रद्धा व भक्तिची अनुपम छटा पहायला मिळाली. दिल्ली, एन. सी.आर.सहित देश-विदेशातील हजारों भाविक-भक्तगणांनी या दिव्य समागमामध्ये भाग घेऊन आध्यात्मिक आनंदाची दिव्य अनुभूती प्राप्त केली. इस पावन प्रसंगी महान संत सन्तोखसिंहजी यांच्यासह अनेक संतांच्या तप, त्याग आणि ब्रह्मज्ञानाच्या प्रचार-प्रसारामधील त्यांच्या अमूल्य योगदानांचे स्मरण केले गेले आणि त्यांच्या जीवनातून प्रेरणा घेण्यात आली.

समागमा दरम्यान अनेक वक्ते, कवी व गीतकारांनी विभिन्न माध्यमातून गुरुचा महिमा आणि भक्तीभावनेचे सारगर्भित वर्ण केले आणि संतांच्या प्रेरणादायी शिकवणूकीतून भाविकांच्या जीवनातील आध्यात्मिक दृष्टीकोन समृद्ध केला.

सतगुरु माताजींनी माता सविंदरजी आणि निरंकारी राजमाताजी यांचे जीवन भक्ती आणि समर्पणाचे मूर्तिमंत प्रतीक असल्याचे सांगून या दिव्य विभूतींचे जीवन हे भक्ती आणि सेवा यांचे श्रेष्ठ उदाहरण असल्याचे सांगितले. निरंकारी मिशनचा मूळ सिद्धांत हाच आहे, की भक्ती ही परमात्म तत्वाला जाणूनच सार्थक रूप घेऊ शकते. निःसंदेह सतगुरु माताजींच्या अमूल्य प्रवचनांनी भाविक भक्तगणांना जीवनात ब्रह्मज्ञानाद्वारे भक्तीचे वास्तविक महत्व समजण्याची आणि अंगीकारण्याची प्रेरणा मिळाली.

### माजी आमदार जगन्नाथ शिंदे यांच्या

# अमृत महोत्सवानिमित्त दोन कोटींच्या विकासकामांचा शुभारंभ



**कल्याण लोकसभा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या निदर्शनात परिस्थिती आणून जनतेच्या विकास कामासाठी २ कोटी निधी उपलब्ध करून दिला.**

**दै.ठाणे जीवनदिप वार्ता कल्याण(प्रतिनिधी)**

ऑल इंडिया केमिस्ट ॲण्ड ड्रगिस्ट असोसिएशनचे अध्यक्ष, माजी आमदार जगन्नाथ उर्फ आप्पा शिंदे यांच्या अमृत महोत्सवी वाढदिवसानिमित्त २ कोटी रुपयांच्या विकास कामांचा शुभारंभ व लोकार्पण कल्याण पूर्व विजयनगर परिसरात करण्यात आले.

कल्याण डोंबिवली महानगरपालिकेमध्ये गेले तीन वर्षे प्रशासकीय राजवट सुरू असून नगरसेवकांना जनतेच्या कामाची पूर्तता करण्यासाठी पुरेसा निधी मिळत नसल्याने, शिवसेना नगरसेविका माधुरी प्रशांत, शिवसेना संपर्कप्रमुख, निरीक्षक कल्याण पूर्व विधानसभा क्षेत्र प्रमुख प्रशांत काळे यांनी तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, कल्याण लोकसभा खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या निदर्शनात परिस्थिती आणून जनतेच्या विकास कामासाठी २ कोटी निधी उपलब्ध करून आणला. त्यातील बहुतांशी कामे पूर्ण होऊन त्याचे रविवारी स्थानिक कार्यकर्ते यांच्या हस्ते प्रशांत काळे आणि माधुरी काळे यांच्या उपस्थितीत लोकार्पण करण्यात आले.

पोहच रस्ता, पेव्हर ब्लॉक, सिमेंट कॉंक्रीट रस्ते, पाणी योजना अश्या अनेक केलेल्या कामांचे लोकार्पण करण्यात आले. याबाबत प्रशांत काळे यांनी पत्रकारांशी संवाद साधून तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांचे आभार मानून, आपल्या पाठीशी उभे राहणारे नागरिक यांच्यासाठी आपण सदैव विकास कामांसाठी बांधील असल्याचे सांगितले.

यावेळेस शिवसेनेचे विभाग प्रमुख सत्यवान खेडेकर, संतोष साळवी, अनंत आंब्रे, विभाग संघटक प्रशांत मांजरेकर, दिलीप कोल्हे, विशाल विरा, विभाग समन्वयक महेंद एटमे, उपविभाग प्रमुख संभाजी माने, भगवान सोंडकर, शाखाप्रमुख विशाल वाघमारे, प्रदीप तांबे, उपशाखाप्रमुख विकास गुरव, अतुल वाघमारे, सुरेंद्र मोरे, प्रमोद लाड, अमर मलाह, नंदकिशोर सुरकुतवार, राजाराम पठारे, साहेबराव आहिरे आणि मोठ्या संख्येने महिला आघाडी पदाधिकारी, शिवसैनिक उपस्थित होते.

### संपूर्ण खारेपाटातील जनतेने वेळीच सावध व्हा अन्यथा..

# विकासाच्या प्रक्रियेत आपले अस्तित्व गमावणार

## -सी.आर.म्हात्रे

**दैनिक ठाणे जीवनदिप वार्ता पेण(प्रतिनिधी)**

मुंबई पासून समुद्र मार्गे सुमारे १८ कि. मी अंतरावर असणारा हा आगरी,कोळी बांधवांचा उद्धार करणारा पट्टा,यावर सरकार, भांडवलदार,आत्ता उगम पावणारे विकासक,यांनी जणू हा पट्टा कसा नाहीसा होईल,आणि आपला विकास कसा होईल हे उरी स्वप्न बाळगले आहे.

सुरुवातीच्या काळात परशुराम पुरिया नामक विकासक येऊन गेला त्याने पाय रोवण्याचा प्रयत्न केला होता असे समजते,पण त्याला काही जमले नाही तदनंतर सेझ नामक विकासक रिलायन्स आले,त्याने तब्बल,बक्कळ,जमीन बळकावण्यासाठी खास फौज तयार केली,ऑफिस थाटले,निवृत्त महसूल खात्यातील कर्मचारी नेमले, दलाल नेमले मोठा पगार देऊ केला,त्यात ते यशस्वी झाले.जमीन खरेदी केली, विविध प्रकारचे दस्त तयार केले, काही ठिकाणी लोकांना भक्ष बनवून सेझचे सात बा-यावर नाव लाऊन घेतले.पण पण आज सुमारे सतरा अठरा वर्ष ज्या उद्देशासाठी जमीन घेतली तो प्रकल्प,करता आला नाही. त्यामुळे सेझ आणि सरकार यांतील करार काय होता याबाबत संभ्रम आहे कारण मंत्री महोदय वि.खें.पाटील, उद्योग मंत्री उदय सामंत,यांच्या बरोबरच्या मीटिंग मधील उद्देश आश्वासन पूर्ण झाला नाही.कारण एवढी मोठी कंपनी यांच्या विरुध्द निर्णय घेणे कदाचित अडचणीचे ठरेल ही भावना असावी. शेतकरी वर्ग हा गृहीत धरलेला वर्ग,त्यांना मधाचे बोट दाखविण्याचा प्रकार आहे.एकीकडे जिल्हाधिकारी यांच्याकडे संघटना पाठ पुरावा करते, दुसरी संघटना कोर्टात लढा देत आहे मात्र२४गाव संघर्ष समिती मात्र यशस्वी लढा देत आहे.आत्ता हे सरकार आपले सरकार ही भावना आहे..मुख्यमंत्री महोदय यांचा ड्रीम प्रोजेक्ट महामुंबई ,तिसरी मुंबई ते जिद्दीला पेटले तर पूर्ण करणारच. जर सेझचे ७/१२ निघाले आणि त्यांनी एका ठिकाणी भूखंड मागितला तर **mmrda** लोकांना देशोधडीला लावेल.कटू सत्य.आज हवाई पाहणी नुसार लोकांचा विरोध प्रभावी ठरेल का यात शंका आहे.

आज उरण पनवेल येथील नैना प्रकल्प करताना नागरिकांना घरे तोडण्याच्या नोटीस देतात मग आपला विभाग सुध्दा असाच भरडला जाईल.महामुंबई वृत्तान्त यामध्ये पुणे,बंगलोर,यांच्या पेक्षा मोठा आयटी पार्क होणार ,नोकऱ्या मिळणार पण या नोकऱ्या मिळाव्यात यासाठी आपल्याकडील मुलांचे तेवढे शिक्षण हवे.त्यांना कोणत्या प्रकारचे शिक्षित तरुण पाहिजे त्याच प्रकारचे कोर्सेस दिले पाहिजे नाहीतर पर राज्यातील मुलांना जास्त संधी मिळेल ,रोजगार विविध प्रकारचा मिळेल हे जरी सत्य असले तरी,आज रै ने कंपनीत कायम स्वरुपी कोणाला घेतलेत ,याचे उत्तर नकारार्थी येईल,आज घुळीत काम करणारे आपलेच आहेत कंत्राटी कामगार. म्हणून आपल्या लोकप्रतिनिधींनी हा धोका ओळखून या **mmrda** लोकांना काय देणार आहे,गावे,गावाबाहेरील घरे यांस कोणते संरक्षण मिळणार आहे, नुकसाभरपाईची पद्धत काय,किती वेळात ,शाळा,कॉलेज, हॉस्पिटल,आमचीमंदिरे,आहेत,आमची शेत तळे,आमच्या पूर्वापार राखून ठेवलेले देवस्थानच्या जमिनी,बरेच प्रस्न निर्माण होतील,आणि मलई भलतेच खातील..म्हणून आपल्या १२४ गावातील लोकांनी अभ्यास करूनच निर्णय घेतला पाहिजे.

आज सेझ मुक्त जमीन झाली तरच पुढील निर्णय होईल नाहीतर रिलायन्स इंडस्ट्रीज काय करेल याचा भरोसा नाही.सरकारने कायद्याचा आधार घेऊन १५ वर्षात कोणताही प्रकल्प केला नाही म्हणून ती जमीन परत केली पाहिजे...जर सरकार आपले आहे तर हे शक्य आहे....कारण आले देवाजीच्या मना तेथे कोणाचे चालेना.आज गेल पाइप लाइन समुद्र मार्गे नेता येत नाही असे ठामपणे सांगतात तसे झाले तर सातबाऱ्यावर पाइप लाईन शिक्का बसला की इमारत परवानगीनाही.जमीन विकासक घेणार नाही.म्हणून आत्ताचं संघर्ष केला पाहिजे..येणाऱ्या सहा महिन्यांत काही पाऊले उचलली नाहीत तर समजावे आपली नौका बुडणार ,बळावली जाणार...कोणीही सोबत येणार नाही.आत्ता जेसीबी,ट्रक,मोठाले ट्रॅक्टर,यांची बुकिंग केली जात आहे.कारण एकच मटेरियल सप्लायर त्यांना माहीत झालाय .तिसरी मुंबई महानगर बसविला जाणार म्हणजे जाणार.आपल्या विभागातील सर्वच जाणकार मंडळींनी शेतकऱ्यांचा विचार करून त्यांना मदत करून समजाप्रती आपले उत्तरदायित्व निभावले पाहिजे.नाहीतर विनाशकाले विपरीत बुद्धी अशी गत झाल्याशिवाय राहणार नाही अशी माहिती पेण खारेपाटातील सामाजिक कार्यकर्ते सी.आर.म्हात्रे यांनी दिली.

**नियमित वाचा**
**दैं. ठाणे**
**जीवनदीप वार्ता**

'ठाणे जीवनदीप वार्ता' हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक तथा संपादक श्री.रविंद्र नारायण घोडविंदे यांनी; महाराष्ट्र प्रिंटिंग प्रेस, हाऊस नंबर ८६२, उलनचाळ, अंबरनाथ (पश्चिम), जिल्हा - ठाणे, महाराष्ट्र - ४२१५०५ येथे छापून, एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१ येथून प्रसिद्ध केले.
(या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या, लेख, जाहिराती इत्यादींशी संपादक सहमत असतीलच असे नाही)
मुख्य कार्यालय - एम/ए-१०६, एम टाईप बिल्डिंग, कृषी उत्पन्न बाजार समिती आवार, फोर्टीस हॉस्पिटल समोर, बैलबाजार, कल्याण (प.) जि.ठाणे ४२१३०१
संपर्क क्रमांक : ९६१९१८८५५८, E Mail - jeevandeepvartanews2020@gmail.com / news.thanejeevandeep@gmail.com
RNI NO : MAHMAR/2016/72091 g Postal Registration No. THC/256/2022-2024 (सर्व कायदेशीर न्यायनिवाडा मा.कल्याण सत्र न्यायालयात) कायदेविषयक सल्लागार - ॲड. जयकुमार ए. रिजवानी